दैनिक **रायगड नगरी**
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
शुभ दिपावली
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २०५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२५ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### तळा शहरात धक्कादायक घटना

# नगराध्यक्षा आणि त्यांच्या पतीची महिलेस दिवसाढवळ्या मारहाण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव विभागात येणाऱ्या तळा शहरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी ही घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगल पारखे या महिलेला तळा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर आणि त्यांचे पती चंद्रकांत भोरावकर यांनी दिवसा ढवळ्या हाताने लाथेने मारहाण करत जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे.

तळा शहरातील मंगल पारखे या महिला आपल्या पगाराचे पैसे अद्यापही देण्यात आले नाहीत म्हणून तळा नगरपंचायत येथे माहिती काढण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्याठिकाणी



असलेल्या नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर व त्यांचे पती चंद्रकांत भोरावकर यांनी तू पुन्हा नगरपंचायत कार्यालयात आलीस तर तुला ठार मारू अशी धमकी दिली असा आरोप पारखे यांचा आहे. या धमकीनंतर त्यांनी हाताने व लाथेने मंगल पारखे यांना बेदम मारहाण केली.

नगराध्यक्षा व त्यांच्या पतीकडून आपल्या जीवाला धोका असल्याचा आरोप देखील त्यांच्याकडून करण्यात आला आहे. याबाबत नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर व त्यांचे पती चंद्रकांत भोरावकर यांच्यावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिवाळीच्या दिवशी श्रीवर्धनकर अंधारात

### महावितरण अधिकाऱ्यांचा संपर्क स्विच ऑफ

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिवाळी हा दिव्यांचा सण म्हणून संपूर्ण देशात साजरा होत आहे. मात्र, श्रीवर्धन महावितरणच्या नियोजनच्या अभावामुळे तालुक्यातील जवळपास पन्नासहुन अधिक गावात वीज नसल्याने अंधार पसरला आहे.

परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडताच विजेचा लंपडाव सुरू होतो. फक्त पावसाची सुरूवात झाली रे झाली की येथील वीज गायब होत असल्याचा अनुभव नागरिकांना येत आहे. काही वेळेला वादळ–वार्यात दक्षता म्हणून वीज बंद केली जाते.

मात्र, सद्या आठवडाभरात पाऊस न वादळ, अचानक ऐन दिवाळीच्या दिवशी महावितरण विभागाने दिवे लावल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन शहरातील सबस्टेशनवर दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगून महावितरण अधिकाऱ्यांनी हात वर केले आहेत. परंतु, श्रीवर्धनमध्ये वीज वितरण कार्यालयाचा नेहमीच ठिसाळ व निष्क्रिय कारभार दिसून येतो. यंत्रणेच्या कमकुवतपणामुळे नागरिकांना सणासुदीला अंधारात बसावे लागत आहे. रोज दिवसा दर अर्ध्या तासाला विजेचा लपंडाव असायचा.

आता तर दिवसभर विजेअभावी ऑक्टोबर महिन्यातील उष्णता नागरिकांना सोसावी लागत आहे. किमान दिवाळीच्या आधी तरी तत्परता दाखवून अंधार दूर करणे अपेक्षित होते असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



गेली १७ वर्षे अविरतपणे वाटचाल करणाऱ्या दैनिक रायगड नगरीच्या दिपरंग २०२२ या दिवाळी अंकाचे प्रकाशन लक्ष्मीपूजनाच्या शुभ मुहूर्तावर रायगड जिल्ह्यातील निर्भीड पत्रकार आणि दैनिक रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दैनिक रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे, कार्यकारी संपादक अरविंद पोतदार, प्रतीक वेदपाठक, भारत बनसोडे, सुनील वारगडा आणि पोतदार कुटुंबीय उपस्थित होते.

# सुश्राव्य सुरेल गाण्यांच्या मैफिलीने पनवेलमध्ये दिवाळीची पहाट सजली

### हजारो रसिकांनी घेतला संगीत फराळाचा आस्वाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दीपावलीची पहाट, त्यातच थंडीचा गारवा आणि त्यामध्ये सुश्राव्य सुरेल गाण्यांच्या मैफिलीने पनवेलमध्ये दिवाळीची पहाट सजली होती. निमित्त होते ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, युवा नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय नाट्य परिषद पन–वेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे संपन्न झालेल्या 'दिवाळी पहाट'चे.



यंदा दिवाळी पहाटचे सहावे वर्ष होते. यामध्ये झी मराठी लिटिल चॅम्प फेम प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे, तसेच सूर नवा ध्यास नवा स्पर्धक प्रणय पवार हे प्रसिद्ध गायक मंडळी सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल सादर केली. एकाहून एक गीते सादर करीत त्यांनी रसिकांची वाहवा मिळवली तर या सोहळ्याचे निवेदनही तेवढ्याच खुमासदार पद्धतीने सुप्रसिद्ध निवेदिका धनश्री दामले यांनी केले. यावेळी वाद्यवृंदावरची साथही तेवढीच ताकदीची होती. तबल्यावर विवेक भागवत, पखवाज, ढोलक आणि ढोलकीवर राजू साळवी, ऑक्टोपॅडवर शशांक खाडकर, बासरी विक्रांत तरे, संवादिनी केदार भागवत, तर कीबोर्ड वर स्वप्नील कदम यांनी साथ दिली.

दीपावली म्हंटली कि दिव्यांचा, आनंदाचा आणि संस्कृतीचा सण. या सणानिमित्त लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वत्र आनंद आणि विविध कार्यक्रमांची रे–लचेल पहायला मिळते. त्यात सुरांच्या अविष्कारांनाही अनन्य साधारण महत्व आहे. दीपावली सण विविध फराळ, फटाक्यांची आतषबाजी, .../२

# परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको अग्रेसर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### सिडकोच्या ७,८४९ घरांच्या महागृहनिर्माण योजनेचा शुभारंभ



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

विविध आर्थिक स्तरांतील नागरिकांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको महामंडळ संपूर्ण देशात अग्रेसर आहे, असे प्रशंसोद्गार मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी काढले. सिडको महामंडळातर्फे दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर दि. २४ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रारंभ करण्यात आलेल्या ७,८४९ घरांच्या महागृहनिर्माण योजनेची घोषणा मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे केली, त्यावेळी त्यांनी हे उद्गार काढले. सिडकोच्या या महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व२ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व पी३ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील ७,८४९ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २५ ऑक्टोबर २०२२ पासून सुरुवात होणार आहे.

सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेद्वारे पुन्हा एकदा हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यार असल्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आपल्या व्हिडिओ संदेशाद्वारे सांगितले.

सिडकोतर्फे आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सातत्याने विविध .../२

**सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे भविष्यात उलवे नोडला मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त होणार आहे. सिडकोने दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर आणलेल्या महागृहनिर्माण योजनेद्वारे परिवहनदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या उलवे नोडमध्ये घर घेण्याची संधी प्राप्त झाली आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेतर्फे शेलघरमध्ये पत्रकार परिषद



**दै.रायगड नगरी । उरण**

न्यू मॅरिटाईम अँण्ड जनरल कामगार संघटना ही कामगार क्षेत्रातील अत्यंत नामवंत व सुप्रसिद्ध व विश्वसनीय अशी कामगार संघटना असून दरवर्षी या संघटनेचा विकासाचा आलेख उत्तर–त्तर वाढतच आहे अशा या संघटनेतर्फे दिवाळीनिमित्त दरवर्षी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येते.पत्रकारांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने न्यू मॅरिटाईम अँन्ड जनरल कामगार संघटनेच्या वतीने सोमवार दि २४ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता स्व. जोमा नारायण घरत समाज मंदिर हॉल शेलघर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.पत्रकारांशी संवाद साधताना संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील यांनी पत्रकार परिषद घेण्या पाठमागची भूमिका स्पष्ट करून उपस्थित पत्रकारांशी संवाद साधला.

कामगार संघटनेविषयी उपस्थित पत्रकारांना माहिती दिली. संघटनेचे कार्याध्यक्ष पी. के रमण यांनी संघटनेची घौडदौड कशी झाली हे सांगत संघटनेची माहिती पत्रकारांना दिली. शेवटी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र घरत यांनी पत्रकारांशी संवाद साधला न्यू मॅरिटाईम न्ड जनरल कामगार संघटनेचे १६१ हून जास्त यूनिट, १२९१० हून अधिक सभासद संख्या, नविन यूनिट–९ तर पगारवाढीचे १४ करार करण्यात आल्याचे सांगत संघटनेच्या या घौडदौड मध्ये, संघटनेच्या प्रगतीमध्ये पत्रकारांचेही महत्त्वाचे योगदान आहे. पत्रकारांचे योगदान संघटनेसाठी महत्वपूर्ण आहे. पत्रकारांचे योगदान विसरून चालणार नाही असे सांगत पत्रकारांच्या कार्याचे कौतूक केले. तसेच न्यू मॅरिटाईम न्ड जनरल कामगार संघटना सदैव पत्रकारांच्या सोबत असेल, पत्रकारांच्या सुख दुःखात सहभागी असेल असे यावेळी सांगितले. संघटनेच्या यशात पत्रकारांचे महत्त्वाचे योगदान असल्याने त्यांच्याप्रती आदर राखत दरवर्षी दिवाळीत पत्रकार परिषद घेऊन पत्रकारांशी संवाद साधला जातो असेही महेंद्र घरत यांनी यावेळी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर कामगार नेते महेंद्र घरत सरचिटणीस वैभव पाटील, कार्याध्यक्ष पी. के.रमण, व्हाईस प्रेसिडेंट किरीट पाटील, .../२

# देववाणी ते द्वेषवाणी

कोणत्याही धर्माच्या नागरिकांनी द्वेषमूलक वक्तव्ये केली तर तक्रार येण्याची वाट पाहू नका. स्वत:हून अशा विधानांची दखल घेऊन त्वरित कारवाई करा, असा महत्त्वपूर्ण आदेश सर्वोच्च न्यायालयाने देशातील कायद्याचे रक्षण करणाऱ्या यंत्रणांना म्हणजे मुख्यत: पोलिस दलांना दिला आहे. देशभरात सध्या हिंस्र, द्वेषमूलक आणि बहिष्काराची भाषा करण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. भाषेतला धर्मद्वेष किती टोकाला जाऊ शकतो, याची दोन उदाहरणे आपण अलीकडेच पाहिली आहेत. ईशनिंदेचा ठपका ठेवून दोन हिंदू तरुणांची गळा चिरून हत्या करण्यात आली. यातला एक प्रकार महाराष्ट्रात तर दुसरा राजस्थानात घडला. याचप्रमाणे, कसायाकडे गायी घेऊन चालल्याचा ठपका ठेवून मुस्लिम तरुणांचीही हत्या करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्या. हृषिकेश रॉय यांनी पत्रकार शाहीन अब्दुल्ला यांच्या याचिकेवर आदेश देताना 'कोणत्याही धर्माच्या कोणत्याही इसमाने केलेले कोणतेही द्वेषमूलक विधान हे सारखेच आक्षेपार्ह आणि दंड्य मानले पाहिजे,' असे स्पष्ट केले. न्यायमूर्तींनी 'भारत हा सेक्युलर देश असल्याची'ही आठवण याचक आणि त्यांच्या वकिलांना करून दिली. 'देशातील मुस्लिम समुदायाला लक्ष्य करून दहशतीच्या अमलाखाली आणण्याचे प्रयत्न चालू आहेत आणि हे न्यायालयाने थांबवावे,' अशी विनंती करणारी ही याचिका होती. अब्दुल्ला यांचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिबल होते. हे प्रकरण भाजपचे खासदार परवेश साहिबसिंग वर्मा यांच्या ईशान्य दिल्लीतील दिलशाद खान गार्डनमध्ये केलेल्या भाषणामुळे सुरू झाले आहे. 'त्यांचे (म्हणजे मुस्लिमांचे) डोके आम्ही ताळ्यावर आणू. त्यांच्या ठेल्यांवर बहिष्कार घाला. वस्तू घेऊ नका त्यांच्याकडून..' असे आणि इतरही बरेच हे वर्मामहाशय बरळले. इतकेच नाही तर 'घेणार नाही' अशी प्रतिज्ञा त्यांनी समर्थकांकडून वदवून घेतली. याच कार्यक्रमात उत्तर प्रदेशातील भाजप आमदार नंदकिशोर वर्मा 'आमचे सुंदर शहर म्हणजे आज वराहनगर बनले आहे,' अशी टीका केली. ही दोन्ही भाषणे अत्यंत आक्षेपार्ह होती आणि भाजपश्रेष्ठांनी या दोन्ही लोकप्रतिनिधींवर कडक कारवाई करण्याची गरज होती. याच भाषणांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर आल्यानंतर खंडपीठाने जी वस्तुनिष्ठ, समतोल आणि निष्पक्ष भूमिका घेतली, तिचे विशेष कौतुक आणि स्वागत करायला हवे. न्यायमूर्तींनी राज्यघटनेतील वैज्ञानिक दृष्टी स्वीकारण्यास सांगणाऱ्या ५१ (अ) या कलमाचा खास उल्लेख निकालपत्रात केला. भाजपसहित सर्वच राजकीय पक्षांनी खरेतर आपापल्या लोकप्रतिनिधी आणि समर्थकांसाठी 'घटनावाचनाचे वर्ग' घेण्याची गरज आहे. हनुमानचालीसा पठण किंवा नुसत्याच मशिदींवरून पहाटे बांगा देण्याऐवजी ते अधिक महत्त्वाचे आहे. याचकाचे वकील कपिल सिबल यांना खंडपीठाने सुनावणी करताना काहीशा कडक शब्दांत समजही दिली. 'एकाच धर्माची बाजू आमच्यासमोर आणून आमच्याकडून तसा आदेश मिळविण्याचा प्रयत्न करू नका..' असे त्यांनी सिबल यांना सुनावले. शेवटी, दोन्हीकडच्या म्हणजे हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजांतील कडव्या, समाजद्रोही, द्वेषमूलक बोलणाऱ्यांना एकाच मापाने मोजून सारखीच वागणूक द्यायला हवी, हे कपिल सिबल यांना न्यायालयासमोर मान्य करावे लागले. भारताच्या राज्यघटनेला हीच निष्पक्ष समानता अपेक्षित आहे आणि ते न्यायमूर्तींना सिबल यांच्या लक्षात आणून द्यावे लागले. भारतीय जनता पक्षाचे अनेक लोकप्रतिनिधी तसेच इतरही हिंदुत्ववादी संघटनांचे काही सदस्य सातत्याने हिंसक भाषा वापरत आहेत. दुसरीकडे, 'जमीयत उलेमा ए हिंद'च्या व्यासपीठावर दोन हजार मुस्लिम धर्मगुरूंनी मंजूर केलेल्या एका ठरावात 'समान नागरी कायद्या'ला ठाम विरोध केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जर समान नागरी कायद्याचा स्पष्ट उल्लेख आहे तर असे ठराव हे घटनाविरोधी ठरतात. हैदराबादी ओवैसी बंधूंचे तर काही विचारूच नका. आगीत तेल ओतायला ते सदैव सज्जच असतात. दोन्ही बाजूंनी जर असे वर्तन होणार असेल तर सर्वोच्च न्यायालयाला वाटणाऱ्या चिंतेची काळजी तरी कोण वाहणार? देशातल्या कोणत्याही नागरिकाच्या व्यवसायावर बहिष्कार घाला, असे म्हणणे हे केवळ अन्यायकारक आणि घटनाविरोधी नाही तर हातावर पोट असणाऱ्या गरीब व सामान्य तरुणांना दहशत आणि अतिरेकाच्या वाटेवर ढकलून देण्यासारखे आहे. सर्वच धर्मांचे महापुरुष बहुतेकदा प्रेमाचा, शांतीचा आणि बंधुभावाचा संदेश देतात. त्यांचा तो उपदेश आपण देववाणी म्हणून शिरोधार्य मानतो. अशावेळी, सेक्युलर म्हणजे सर्व धर्मांना समान मानणाऱ्या भारतात द्वेषवाणीला स्थान नाही, हे न्यायालयाचे सांगणे सर्व पक्ष आणि संघटनांसाठी आहे. कारण चूड लावण्याचे काम तेच करतात. सत्ताधारी म्हणून भाजप नेत्यांवर ही जबाबदारी सर्वाधिक आहे. ती त्यांनी पेलली नाही आणि पक्षातील नालामुखे बंद केली नाहीत तर कायद्याचे अभिरक्षक म्हणून सर्व दोषींवर समान कारवाई करण्याची सत्ताधाऱ्यांची नैतिक ताकद उणावेल. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा हाच सारांश आहे.

# कर्जत मध्ये रंगली दिवाळी संध्याची सुरेल मैफल, श्रोते मंत्रमुग्ध



**दै.रायगड नगरी । कर्जत**

बाळासाहेबांची शिवसेना कर्जत शहराच्या वतीने आयोजित केलेल्या स्वर बरसात प्रस्तुत दिवाळी संध्या संगीत मैफलीमध्ये गायकांनी सादर केलेल्या जुन्या – नव्या गीतांमुळे कर्जतकर मंत्रमुग्ध झाले. यावेळी साथ संगत देणाऱ्या कलाकारांनी उपस्थितांची वाहवा मिळवली

कर्जत मधील श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात दिवाळी संध्या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. गजाननबुवा पाटील स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक करोडे यांच्या हस्ते श्री कपालेश्वराला श्रीफळ अर्पण करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक संकेत भासे,बाळासाहेबांची शिवसेना शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, माजी सरपंच हर्षद विचारे, प्रसाद पाटील, पुंडलिक भोईर आदी उपस्थित होते. दिनेश कडू आणि सायली शहासने यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

सूर निरागस हो..... या अभिषेक नलावडे यांनी गायलेल्या गीताने संगीत मैफलीचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर आली माझया घरी ही दिवाळी....., एकाच या जन्मी....., विकत घेतला श्याम....., विठ्ठला तू वेडा कुंभार....., आम्ही ठाकर ठाकर....., राधा ही बावरी....., कुश लव रामायण गाती....., ऐन दुपारी....., जिवा शिवाची बैलजोड....., ऐरणीच्या देवा....., माळ्याच्या मळ्या मंदी ....., ए मेरी जोहराजबी..... आदी एकापेक्षा एक सरस गीते ॲड. अनिरुद्ध तथा मंदार भिडे, अभिषेक नलावडे, दीपाली देसाई, सई जोशी या गायकांनी गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांना सिंथेसायझर वर ओंकार देवस्कर, ऑक्टोपॅड वर प्रवीण भोपी, तबल्यावर विवेक भागवत, ताल वाद्यावर निलेश देवधर यांनी साथ संगत दिली. अनुया गरवारे – धारप यांनी खास शैलीत निवेदन सादर करून मैफलीची रंगत वाढविली.

आमदार महेंद्र थोरवे यांनी आपल्या मनोगतात, 'कर्जत तालुक्यात भजन भूषण गजाननबुवा पाटील यांच्या मुळे तालुक्याला संगीत भजनाची ओळख निर्माण झाली. त्यांचे स्मारक लवकरच उभारण्यात येईल.' असा शब्द दिला. याप्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, आघाडीची अभिनेत्री जुई गडकरी, मीना थोरवे, पुंडलिक पाटील, भाई गायकर, मोहन ओसवाल, रोहित विचारे, प्रसाद पाटील, सुचिता वांजळे, दिलीप गडकरी, मनीषा भासे, शेखर शहासने, स्नेहा गोगटे, पांडुरंग गरवारे, विकास चित्ते, कुमार गोखले, दिगंबर कांबळे, वैशाली मेढी, विद्या दगडे, विजय बेडेकर, विराज वैद्य, अभिजीत मराठे, भरत गावंड आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल परिसरात झालेल्या २ वेगवेगळ्या अपघातात २ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या २ वेगवेगळ्या अपघातात २ जखमी झाल्याची घटना घडली आहे.

मोहनसिंग बाबूसिंग राजपूत (वय २९) हा त्याच्या ताब्यातील हिरो मोटारसायकल घेऊन पनवेल जवळील करंजाडे आर ४ ते कॉलेजफ़ाटा जाणाऱ्या रस्त्यावर जात असताना त्याला केटीएम मोटारसायकलीवरील चालकाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात तो जखमी झाला आहे.

या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत पनवेल तालुक्यातील आपटे फाटा खारपाडा टोलनाक्याजवळ ह्युंदाई क्रेटा गाडीवरील चालकाने त्याच्या ताब्यातील गाडी भरधाव वेगाने व हरगर्जीपणाने चालवून मोटारसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात महेश भोपी (वय ४४) हे गंभीररित्या जखमी झाले आहेत.

या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवघर येथील भाडेकरूचा हरवलेला मुलगा पोलिसांच्या उपस्थितीत आई-वडिलांच्या स्वाधीन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नवघर येथील भाड्याने राहणारे मनजय राजभर यांचा आठ वर्षाचा मुलगा २२ ऑक्टोबर रोजी ट्युशनला जातो असे सांगून सकाळी १० वाजता घरातून गेला असता दोन – तीन तास उलटुन गेले तरी घरी आला नाही म्हणून त्याच्या आई – वडीलांनी ट्युशनमध्ये जाऊन चौकशी केली असता सदर मुलगा ट्युशनला आलाच नाही असे समजले. संपूर्ण नवघर गावात शोधाशोध केली तरीही मुलगा सापडत नाही हे पाहून नवघरचे माजी उपसरपंच विश्वास तांडेल हे त्याच्या वडीलांना घेऊन जाऊन उरण पोलिस ठाण्यात मुलगा हरवल्याची तक्रार दाखल केली.

उरण पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक रतन राठोर आणि संतोष जगदाळे तात्काळ घटनास्थळी येऊन आई–वडील तसेच आजूबाजूला राहणा–



यांची चौकशी करून त्या रस्त्यावरील प्रा.एल.बी. पाटील यांच्या घराजवळ असणारे सि.सि. टिव्ही फुटेज तपासले असता काहीही सुगावा लागत नाही हे पाहून ग्रामपंचायतीचे लावलेले सर्वच सी.सी.टिव्ही फुटेज तपासण्याचा निर्णय घेतला.सदर पोलिस अधिका–यांनी ग्रामपंचायत कर्मचारी मनोहर पाटील व कैलास भोईर यांना घडलेल्या प्रकाराची माहिती देऊन ग्रामपंचायतीने लावलेले सी.सी.टिव्ही फुटेज तपासायचे असून त्यांना ग्रामपंचायत कार्यालयाकडे बोलावून घेतले असता ग्रामपंचायतीचे सी.सी.टिव्ही फुटेज पाहण्यास सदर पोलिस अधिकारी जात असतांना सदर मुलगा वाटेतच सापडला.

यावेळी उरण पोलिस ठाण्याचे पोलिस नाईक रतन राठोर आणि संतोष जगदाळे यांनी त्या मुलाला आई–वडीलांच्या स्वाधीन केल्याने नातेवाईकांना दिलासा मिळाला. त्यानंतर योग्य प्रकारे योग्य मार्गदर्शन करून मुलाच्या आई–वडीलांनाही समज देण्यात आली. या मुलाच्या शोध मोहिमेत प्रा.एल.बी.पाटील,नवघर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष समाधान तांडेल,माजी उपसरपंच विश्वास तांडेल,उपसरपंच परेश पाटील,सामाजिक कार्यकर्ते उमाकांत पानसरे यांच्यासह त्या मुलाचे भाडेकरू नातेवाईक,नवघर ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सुश्राव्य सुरेल गाण्यांच्या मैफिलीने पनवेलमध्ये दिवाळीची पहाट सजली

रांगोळी, किल्ले बांधणी, शुभेच्छा आदींचा आगळावेगळा व उत्साहाचा सर्वात मोठा सण असतो, आणि या सणानिमित्त झालेल्या या 'दिवाळी पहाट'ने वातावरण प्रफुल्लित व उल्हासमय केले. यावेळी वडाळे तलाव परिसर हजारो श्रोत्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने गजबजला होता. या तलावाच्या सौंदर्याने आणि निर्सगाच्या सानिध्यात झालेल्या मैफीलने पहाट ते कोवळ्या उन्हाच्या साक्षीने तेजोमय संगीत बहरत होते. यावेळी गगन सदन, अबीर गुलाल उधळीत रंग, खेळ मांडीयेला वाळवंटी नाचती वैष्णव, बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल, माझे माहेर पंढरी, बगळ्यांची माळ फुले अजूनही अंबरात, उगवला चंद्र पुनवेचा, काटा रुते कुणाला, मी राधिका मी प्रेमिका, दत्त दर्शनाला जायचं जायचं आनंद पोटात माझ्या मायेना, जीव रंगला दंगला असा, जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा, रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यानी, ये मेरी जोहरा जबी, अवघा रंग एक झाला, अशी अभंग, भक्तीगीते, भावगीते, लावणी, चित्रपट गाणी अशी विविध गीते सादर होताना पनवेलकर रसिक प्रेक्षकांनी गायकांना भरभरून दाद दिली. लहानग्यांपासून ज्येष्ठापर्यंत प्रत्यक्ष हजारो रसिक या संगीत फराळाचा आस्वाद घेत असताना थेट प्रक्षेपणातूनही हजारो रसिकांनी लाभ घेतला. यावेळी सर्व उपस्थितांचे आभार श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव माजी सभागृहनेते व कार्यक्रमाचे आयोजक परेश ठाकूर यांनी मानले.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, शहर सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, सचिन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा,जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष पंडित उमेश चौधरी, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, अर्चना ठाकूर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक हरेश केणी, मनोहर म्हात्रे, मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, प्रवीण पाटील, बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मंदा भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष रोहित जगताप, यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, कला, संगीत, वैद्यकीय, विधी आदी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हा संगीतमय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा, युवा मोर्चा आणि भाजप कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## न्यू मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेतर्फे शेलघरमध्ये पत्रकार परिषद

यूथ प्रेसिडेंट – लंकेश ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, ज्येष्ठ पत्रकार दा. चा. कडू आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उरण तालुका इंटक अध्यक्ष संजय ठाकूर, युवक अध्यक्ष राजेंद्र भगत,संघटक – अनंत ठाकूर,सरचिटणीस अगंद ठाकूर, संघटक – प्रांजल भोईर, अरुण म्हात्रे, संघटक योगेश रसाळ,सरचिटणीस आदित्य घरत आदींनी विशेष मेहनत घेतली. शेवटी संघटनेचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते पत्रकारांना मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी उरण पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील तसेच नवी मुंबई मधील पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको अग्रेसर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातली घरे उपलब्ध करून देण्यात येतात. सिडकोने नवी मुंबई क्षेत्रात आजवर सुमारे दीड लाखांहून अधिक घरे बांधून लक्षावधी कुटुबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार केले आहे. या वर्षीच्या दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर सिडकोने ७,८४९ सदनिकांची महागृहनिर्माण योजना आणली आहे. 'परिवहन केंद्रित विकास' संकल्पनेवर आधारित या योजनेंतर्गत उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व२ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व पी३ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता ७,८४९ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबईतील झपाट्याने विकसित होणारा उलवे नोड हा परिवहन सुविधांनीही समृद्ध आहे. महागृहनिर्माण योजनेतील गृहसंकुलांना नेरूळ–उरण रेल्वे मार्गावरील बामणडोंगरी आणि खारकोपर रेल्वे स्थानकांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच प्रस्तावित मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) द्वारेही उलवे नोडला कनेक्टिव्हिटी लाभणार आहे. सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडपासून नजीकच्या अंतरावर आहे. गृहसंकुलांचा परिसर हा शाळा, महाविद्यालये, रुग्णालय इ. मूलभूत सुविधांनी परिपूर्ण आहे.

महागृहनिर्माण योजनेतील सर्व प्रक्रिया या पारदर्शक अशा ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत. योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २५ ऑक्टोबर २०२२ रोजी सुरुवात होणार आहे. योजनेची संगणकीय सोडत १९ जानेवारी २०२३ रोजी पार पडणार आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी, शुल्क भरणा इ. करीता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेऊन आपले हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# शिंदे-फडणवीसांची कर्जमाफीची 'ती' घोषणा म्हणजे ढळढळीत खोटं : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भू विकास बँकेच्या कर्जमाफीबाबत शिंदे–फडणवीस सरकारकडून केला जाणारा दावा हा पूर्णपणे फसवा असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांनी केला. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत भू विकास बँकेचं कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला होता. मात्र, शरद पवार यांनी राज्य सरकारच्या दाव्यातील विसंगती सोदाहरण दाखवून दिली. ते सोमवारी एका कार्यक्रमात बोलत होते.

आम्ही भू विकास बँकेतील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, असे राज्य सरकारकडून सांगितले जाते. पण मला इथे बसलेल्या लोकांनी सांगावं की, गेल्या १० वर्षांमध्ये किमान एका शेतकऱ्याला तरी भू विकास बँकेचे कर्ज मिळाले आहे का? भू विकास बँक अस्तित्त्वात आहे, ही गोष्ट तरी तुम्हाला माहिती आहे का? भू विकास बँक एकेकाळी होती, पण आता ती राज्यात कार्यरत नाही. आता भू विकास बँकेचे नावही कोणाला माहिती नाही. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून भू विकास बँकेने दिलेल्या कर्जांची वसुलीच झालेली नाही. ही वसुली होणार नाही, हे कळल्यानंतर राज्य सरकारने घोषणा केली की, आम्ही भू विकास बँकेतील शेतकऱ्यांची कर्जे माफ करत आहोत. लबाडाच्या घरचं आवताण जरी असलं तरी जेवल्याशिवा खरं नसतं, असा हा एकंदरित प्रकार असल्याचे शरद पवार यांनी म्हटले. यावर आता भाजप आणि शिंदे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

राज्यातील भू विकास बँकेच्या सुमारे ३५ हजार शेतकऱ्यांचे ९६४ कोटींचे थकित कर्ज माफ करण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. दिवाळीच्या तोंडावर राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्याचा प्रचारही भाजपकडून सुरु झाला होता. राज्यातील शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचे शेतीकर्ज देण्यासाठी राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेची(भूविकास) स्थापना करण्यात आली होती.

या बँकेची राज्य स्तरावर शिखर बँक तर प्रत्येक जिल्हयात भूविकास बँका, ३० उपशाखा होत्या. सुरूवातीच्या काळात शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या या बँकेचे १९९८ पासून कर्ज वितरण बंद झाल्यापासून ही बँक अडचणीत आली. परिणामी सन २००२ मध्ये या बँका अवसायनात काढण्याचा निर्णय सरकारने घेतला. सन २००८मध्ये वैद्यनाथन समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने लाभ मिळवून या बँकांचे पुरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मात्र, त्यानंतरही या बँका वाचविण्यात यश न आल्याने अखेर २०१३मध्ये या बँका अवसायनात काढण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. बँकेच्या कर्मचाऱ्यांची २७५ कोटींची थकबाकीही एकरकमी देण्यात येणार आहे.

# जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना करणार आत्मनिर्भर : जी.एस.हरळय्या

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) व टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड, मुंबई तसेच जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे दिव्यांगांकरिता एक महिना कालावधीचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम जिल्हा उद्योग केंद्र सभागृह, अलिबाग येथे दि.१८ ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न झाला.

या प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण प्रसंगी भारतीय उद्योजकता विकास संस्था, टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड तसेच जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना आत्मनिर्भर करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या यांनी केले.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) व टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड मुंबई द्वारा उदया प्रकल्पांतर्गत अलिबाग तालुक्यातील दिव्यांगांकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये व्यवसायाच्या विविध संधींची ओळख, संवाद कौशल्य, उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, शासकीय कर्ज योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल तयार करणे, क्षेत्र भेट, बाजारपेठ सर्वेक्षण, डिजिटल मार्केटिंग, मार्केटिंग कौशल्य अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या, बँक ऑफ इंडिया चे जिल्हा प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेडच्या सामाजिक दायित्व विभाग प्रमुख पल्लवी बरुआ, सामाजिक दायित्व विभाग व्यवस्थापक संगीता पाध्ये, जॉन डिसुझा, भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय), प्रकल्प संचालक डॉ.प्रकाश सोळंकी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) चे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले तर डॉ.प्रकाश सोळंकी यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोलीस भरती पूर्वतयारी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई ग्रामीण शाखा रोहा अंतर्गत चणेरा विभाग कुणबी ग्रुपच्या वतीने कुणबी समाज सभागृह चणेरा येथे रवि.दि.३० ऑक्टो.रोजी स.१० ते दु.१ या वेळेत पोलीस भरती पूर्वतयारी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रुपच्या वतीने देण्यात आली आहे.

चणेरा कुणबी ग्रुपच्या वतीने नेहमीच समाजोपयोगी वैविध्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करून समाजात जनजागृती केली जात आहे.त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी सेवानिवृत्त सहायक उपायुक्त गुन्हा अन्वेशन विभाग प्रा.पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा रोहिदास दुसार, सेवानिवृत्त पो.निरिक्षक खांबेरे दिनेश बिरगावले,कार्यरत पोलीस निरीक्षक मुंबई नितीन गिजे आदी पोलीस खात्यातील तज्ञांकडून सखोल मार्गदर्शन मिळणार असून जास्तीत तरूणांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवीन पनवेलमध्ये बारा लाखांची घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर एक येथील घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी घरातील १२ लाख सहा हजार रुपयांचे दागिने चोरून नेण्याचा प्रकार घडला. खांदेशवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉक्टर सागर दिलीप कंसारा हे नवीन पनवेल, सेक्टर एक येथे राहतात. त्यांचे वडील दिलीप पांचाळ हे चांदीची मूर्ती घरातूनच मागणीनुसार बनवून देतात. त्यांच्या आजोबांचे निधन झाल्याने ते मूळ गावी काशी, वाराणसी येथे गेले होते. त्यांनी त्यांच्या घरी काम करणारे रामचरण कंसारा यांना केअरटेकर म्हणून ठेवले होते.

तो रात्री घर लॉक करून निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी दरवाज्याचे लॉक तोडलेले असून चोरी झाल्याचे सागर कंसारा यांना कळवले. ते उत्तर प्रदेश वरून घरी आले. यावेळी देवघरातील पैसे, चांदीच्या वस्तू, सोन्याचे दागिने, चांदीची मूर्ती, चांदीच्या विटा, पत्रे हे सर्व बारा लाख सहा हजार रुपये किमतीचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# उरण बीपीसीएल कंपनीच्या अन्यायाविरोधात अविनाश ठाकूर यांच्या आमरण उपोषणाचा ८ वा दिवस

**दै.रायगड नगरी । उरण**

बीपीसीएल (भारत पेट्रोलिएम कॉरपोरेशन लिमिटेड) हा केंद्रशासनाचा राष्ट्रीय प्रकल्प उरण तालुक्यात भेंडखळ येथे कार्यरत असून भेंडखळ गावातील ग्रामस्थांनी आपल्या पिकत्या जमिनी कवडीमोल भावाने बीपीसीएल प्रकल्पाला(कंपनीला) दिले. शेतजमीनीच्या बदल्यात शेतकऱ्यांना नोकरी देण्याचे आश्वासनही कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांना दिले होते. मात्र भेंडखळ येथील स्थानिक रहिवाशी असलेले प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांची जमीन (शेती) या प्रकल्पासाठी संपादित झाली असूनही या गोष्टीला आज जवळ जवळ ३० ते ३५ वर्षे झाले तरीही अविनाश रमण ठाकूर यांना नोकरित सामावून घेण्यात आलेले नाही. गेली ३० ते ३५ वर्षे लोकशाही व कायदेशीर मार्गाने सर्वच शासकीय विभागात कार्यालयात पत्रव्यवहार करून सुद्धा न्याय मिळत नसल्याने प्रकल्पग्रस्त अविनाश रमण ठाकूर यांनी भेंडखळ येथील बीपीसीएल कंपनी गेट समोरच सोमवार दि. १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११वाजल्या पासून आमरण उपोषण सुरू केले होते. आज



दिनांक २४ ऑक्टोबर २०२२ रोजी आमरण उपोषणाचा ८ वा दिवस असूनही बीपीसीएल प्रशासनाने तसेच उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनीही या महत्वाच्या समस्याकडे पाठ फिरविल्याने तसेच एकदाही उपोषण कर्त्याची भेट घेतली नसल्याने प्रकल्पग्रस्तामध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे.

दि १७/१०/२०२२ रोजी अविनाश रमण ठाकूर यांनी उरण तालुक्यातील भेंडखळ येथील बिपीसीएल कंपनी गेटसमोर आमरण सुरु केले आहे. आज उपोषणाचा ८ वा दिवस असूनही अविनाश रमण ठाकूर यांच्या उपोषणाकडे तहसीलदार व बीपीसीएल प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप उपोषण कर्ते अविनाश ठाकूर यांनी केले आहे.अविनाश ठाकूर यांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती होती.ती कंपनीला दिली .आता उपजिविकेचे कोणतेच साधन उपलब्ध नसल्याने अविनाश रमण ठाकूर यांना बीपीसीएल कंपनी प्रशासनाने नोकरीत सामावून घ्यावे अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे. यासाठी भेंडखळ ग्रामस्थ मंडळाने या आमरण उपोषणाला जाहिर पाठींबा दिला आहे.

तसेच जेएनपीटीचे विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील, शिवसेनेचे उरण विधानसभा संपर्क प्रमुख तथा कामगार नेते महादेव घरत,राष्ट्रवादी काँग्रेस कांग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष मनोज भगत, भारतीय जनता पार्टीचे मिलींद पाटील, भारत मुक्ती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा सूर्यवंशी, बहुजन क्रांती मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष–मनोज रामधरणे, राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष – धर्मपाल जाधव, राष्ट्रीय पिछडा वर्ग (जइउ) मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष जंगबहादुर चौधरी, बहुजन मुक्ती पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रविण पाटील, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे उरण तालुका उपाध्यक्ष शिवाजी ठाकूर, छत्रपती क्रांती सेनाचे रायगड जिल्हाध्यक्ष–श्रेयश म्हसकर, वारकरी संप्रदायाचे प्रभाकर ठाकूर, भारतीय जनता पार्टी आदी विविध राजकीय पक्षाचे तसेच विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी हजर राहून अविनाश रमण ठाकूर यांच्या आमरण उपोषणास जाहिर पाठींबा दिला आहे.उपोषण मुळे तब्येत बिघडल्याने त्यांना मध्ये काही दिवस हॉस्पिटल मध्ये एडमिट सुद्धा करण्यात आले होते.

मात्र पुन्हा त्यांनी कंपनी समोर उपोषण सुरु केले आहे.मात्र एवढे दिवस उलटून गेले तरी उपोषण स्थळी बीपीसीएलचे अधिकारी तसेच तहसीलदार यापैकी कोणीच फिरकले नसल्याने ग्रामस्थांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. प्रकृती खालवल्याने अविनाश ठाकूर यांना रविवार दि २३/१०/२०२२ रोजी सकाळी ११:३० इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय मध्ये ऍडमिट करण्यात आले आहे. माझे जीवाचे काही बरे वाईट झाल्यास बीपीसीएल कंपनी व महाराष्ट्र शासन यास जबाबदार राहील असे अविनाश ठाकूर यांनी यावेळी सांगितले.

### सरकारच्या आनंद शिधाचा आनंद हवेत विरला

## मुरुड तालुक्यातील अनेक गावातील लाभार्थी अद्यापही वंचित

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सर्व सामान्य आणि गोरगरिबांची दिवाळी गोड व्हावी. या उद्देशाने राज्य सरकारने मोठा गाजावाजा करत शंभर रुपयात आनंदाचा शिधा किट देण्याची घोषणा केली. वाढत्या महागाईत सरकारच्या या निर्णयामुळे आपली दिवाळी चांगली होण्यात गोरगरिबांना दिलासा मिळाला.

गोरगरिबांची दिवाळी चांगली व्हावी. या हेतूने राज्य सरकारनी शंभर रुपयात आनंदाचा शिक्षा किट यात, रवा, साखर, गोडेतेल आणि चणादाळ या वस्तूंचा समावेश आहे. मात्र दिवाळीच्या सुरुवातीलाच हे किट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असताना दिवाळीचे दोन दिवस नरक चतुदर्शी व लक्ष्मी पूजन होऊन ही हे किट अद्याप अनेक ठिकाणी पोहोचले नसल्याने त्यांच्या दिवाळीचा, आनंद शिक्षा चा आनंद आज तरी हवेत विरला आहे. सुरुवातीला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्याच्या फोटोमुळे आनंदाचा शिधा किटला विलंब झाल्याचे समजते.

मुरुड तालुक्यातील १७१७५ कार्ड धारकांना या आनंद शिधा किट चा लाभ मिळणार असून तालुक्यातील तळेखार ते नांदगांव भागात हे किट मिळाले असून उर्वरित गावातील गोरगरीब लाभधारकाचा आनंद या आनंद शिक्षा किट न मिळाल्याने अद्याप तरी हवेतच विरला आहे.


## रोहा तालुका मेडिकल असोसिएशनच्या वैद्यकीय शिक्षण शिबिरात तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रोहा तालुका मेडिकल चॅरिटेबल असोसिएशनची तिसरे वैद्यकीय शिक्षण शिबिर नुकतेच नागोठण्यातील कामत रिसॉर्ट मध्ये उत्सा–हात संपन्न झाले. यावेळी तज्ञ डॉक्टरांनी उपस्थित डॉक्टरांना मोलाचे मार्गदर्शन केले. या वैद्यकीय शिक्षण शिबिरात नागोठणे, कोलाड, रोहा, तळा, पाली, पेडली, परळी व रिलायन्स टाऊनशिप येथील डॉक्टरांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. या कार्याक्रामाच्या निमित्ताने नागोठणे रिलायन्स कंपनीचे निवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. उद्धव कुमार यांचा रोहा तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने सपत्नीक सत्कार असो. चे अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आदेश पाथरे, सचिव डॉ. राजेंद्र शिंदे, नवी मुंबई येथील न्यूरोसायक्रटीक डॉ. राहुल भातांबरे, रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक, माजी अध्यक्ष डॉ. सुनिल पाटील, नागोठणे येथील ज्येष्ठ डॉ.जी. एस. कोकणे, डॉ. रोहिदास शेळके, डॉ. अन्वर हाफीज, नागोठण्याचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, असो.चे सचिव डॉ. संकेत म्हात्रे, डॉ. पुरोषोत्तम भोईर, डॉ. अभिषेक शहासने, डॉ. नरेश सोष्टे, डॉ. चिन्मय ओक, डॉ. रुपेश होडबे, डॉ. विनोद गांधी, डॉ. तेजकुमार अपणकर, डॉ. अपुर्व क्षीरसागर , डॉ. प्राजक्ता शहासने आदींसह जिल्हा असोसिएशनचे व तालुका असोसिएशनचे डॉक्टर बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधुन रोहा तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने सीसीएमपी कोर्स पास झालेल्या रोहा, सुधागड व महाड तालुक्यातील डॉक्टरांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## सिडको घनकचरा प्रकल्पाच्या दूषित सांडपाण्यामुळे नदी आणि शेती झाली दूषित



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा घोट येथील सिडको घनकचरा प्रकल्पाच्या दूषित सांडपाण्यामुळे घोट नदी आणि आजूबाजूची शेती दूषित झाली आहे. याप्रकरणी गावदेवी सामाजिक संस्था, घोट यांनी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र तक्रार करून देखील याकडे कानाडोळा करण्यात येत असल्याचा आरोप गावदेवी सामाजिक संस्थेने केला आहे.

तळोजा स्थित सिडको घनकचरा प्रकल्प आणि कचरा विलगीकरण प्रकल्पामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. सिडको घनकचरा प्रकल्पाचे दूषित पाणी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता थेट प्रकल्प बाहेर असलेल्या शेतीमध्ये आणि नदीमध्ये सोडण्यात येत असल्याचा आरोप या संस्थेने केला आहे. दूषित पाण्यामुळे घोट नदी आणि आजूबाजूला असलेली शेती मोठ्या प्रमाणात दूषित झाली आहे. नुकतेच घोट नदी आणि जवळ असलेल्या शेततळ्यातील मासे या प्रकल्पाच्या दूषित पाण्यामुळे मरण पावले होते.

त्यामुळे मोठ्या प्रमाणात या ठिकाणी दुर्गंधी पसरली होती. घोट नदीच्या पात्रातून दूषित पाणी पेंधर आणि तळोजा फेस टू मधील नवीन वसाहतीच्या बाजूने वाहते. त्या ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बेलापूर येथे देण्यात आली, मात्र त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आ–लेली नाही. तक्रार करून देखील प्रदूषण मंडळ कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करताना दिसून येत आहे.

## आदर्श सेवा भावी संस्थेची दिवाळी आदिवासी पाड्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वत्र दिवाळीचा सण उत्साहात साजरा होत असताना कातकरी पाड्यात आदर्श सेवाभावी संस्थेने आदिवासी भगिनींसाठी एका अनोख्या पद्धतीने भाऊबीज साजरी केली आहे. या उपक्रमातून खारघर मधील घोळवाडी आदिवासी पाड्यातील भगिनींना साड्या आणि दिवाळी फराळ, अन्नधान्य तसेच लहानमोठ्यांना गोड पदार्थ भाऊबीज भेट देण्यात आली. यावेळी पनवेल पालिका खारघर प्रभाग कार्यालयाचे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे,नवी मुंबई महानगर पालिका समाज विकास विभागाचे समाजसेवक सुंदर परदेशी,ज्येष्ठ पत्रकार विश्वरथ नायर,सामाजिक कार्यकर्ते मेघनाथ ठाकूर ,मनेस पाटील, रमेश शर्मा स्वच्छता अधिकारी कुणाल गायकवाड आदी मान्यवर सहभागी झाले होते.

खारघर शहरात सिडकोने उभारलेल्या सेंट्रल पार्क,गोल्फ कोर्स तसेच होवू घातलेल्या कॉर्पोरेट पार्क मुळे शहराचे नाव जगभर झाले. खारघर शहरात टोलेजंग इमारती उभ्या आहेत. मात्र हाकेच्या अंतरावर असलेल्या आदिवासी पाडे विकासापासून दूर आहे. आदर्श सेवा भावी संस्थेने बालवाडी सुरु करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले हि खूप समाधानाची बाब आहे.तुम्ही शिक्षणापासून दूर राहिले मात्र तुमच्या मुलांना चांगले शिक्षण दया असा सल्ला खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांनी दिले. तर प्रभाग अधिकारी जितेंद्र




मढवी यांनी अनोखा भाऊबीज कार्यक्रमात सहभागी झाल्याचे पाहून खूप समाधान वाटत असल्याचे सांगितले. शिक्षण हा आपला तिसरा डोळा आहे. त्यामुळे मुलांना चांगले शिक्षण द्या.असे सांगून तसेच आदिवासी विकास प्रकल्पच्या माध्यमातून विविध योजना सुरु आहे.त्यांचाही ग्रामस्थांनी लाभ घावा असे सांगितले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विश्वरथ नायर ,साजामसेवक सुंदर परदेशी,,सामाजिक कार्यकर्ते मेघनाथ ठाकूर ,मनेस पाटील, रमेश शर्मा यांनी आ–पले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी कै विनायक पाटील समाजक संस्था संस्थेचे सदस्यांनी सहकार्य केले. या उपक्रमासाठी मुसादिक मोडक ,अभिजित मुद्दकल, संतोष शर्मा, संदीप वास्कर, रमेश सुतार तेजस पाटील. राजश्री कदम ,वीर गुप्ता यांनी सहकार्य केले. मेहनत घेतली.

दिवाळी आली की कपडे, फटाके, आकाकंदील खरेदी करायची लगबग सुरू होते. एकीकडे आई फराळ बनवायला सुरुवात करते आणि लेकरांची किल्ला बनवायची तयारी सुरु होते. दरम्यान दोन दिवसात पाड्यातील माया अशोक कातकरी, सोनम रविंद्र कातकरी, आरती मंगेश कातकरी, पूनम जयराम कातकरी, भावना अशोक कातकरी, रोहिणी वसंत कातकरी, प्रतिभा गुलाब कातकरी, निशा जीवन कातकरी, अश्विनी रोहिदास कातकरी, रोहिणी दीपक कातकरी आदी सहावी, सातवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दोन ठिकाणी बनविलेले किल्ले पाहून मान्यवर स्तब्ध झाले. यावेळी सुंदर परदेशी,मेघनाथ ठाकूर,मणेश पाटील आणि रमेश शर्मा आदीं मान्यवरानी आठ विद्यार्थिनीला दोन हजार रुपये बक्षीस देवून कौतूक केले.

## नावडा शाखा अंतर्गत महावितरणची वीज चोरांवर धडक कारवाई , ९३ वीज चोरट्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरणच्या पनवेल विभागातील नावडा शाखा अंतर्गत, महावितरणच्या खांबावरून चोरून वीज घेणाऱ्या वीज चोरांविरुद्ध धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या दीड महिन्यांमध्ये पनवेल येथील नावडा शाखा अंतर्गत एकूण ९३ वीज चोरट्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये १ लाख १७ हजार ३२९ इतक्या युनिटची २१ लाख १९ हजार ८८० रुपयांची वीजचोरी चोरी उघडकीस आणली आहे. तोंडरे, चिंधरण, वावंजा, देवीचापाडा, खेरणे, आंबे, देवीचा पाडा, कुत्तरपाडा इत्यादी परिसरातील वाढते वीजचोरी व वीजगळती विच–ारात घेऊन या भागात नियमित वीज चोरी विरुद्ध कारवाई करण्याचा निर्णय महावितरणाने घेतला आहे. २२ केवी वांगणी फिडर द्वारे ज्या वीज परिसरात वीज पुरवठा केला जातो, तेथील सर्व गावांमध्ये प्रामुख्याने ही मोहीम राबवण्यात येत आहे.


पनवेल शहर विभागातील २२ केवी वांगणी या वीज वाहिनीवर सर्वाधिक वीजहानी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. ही वीजहानी व वीजगळती कमी करण्यासाठी उच्चदाब व लघुदाब तारा बदलणे, खांबांवरील



अतिरिक्त सेवा तारा काढणे, निकामी मीटर बदलणे आणि वीज चोरांविरुद्ध धडक कारवाई करण्याच्या उपाययोजना महावितरणकडून सुरू करण्यात आल्या आहेत. या मोहिमेमध्ये आजपर्यंत तीनशे ३०० हून अधिक नादुरुस्त मीटर बदलण्यात आले आहेत. गेल्या दीड महिन्यात वीज कायदा २००३ च्या कलम १३५ व १२६ नुसार अनियमित वीज ग्राहकांवर कारवाई करून वीजगळती थांबवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संबंधित वीज चोरीच्या बाबतीतील देयक ग्राहकांना देण्यात आलेले आहे. विहित मुदतीत वीज चोरीच्या देयकाचा भरणा न करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल होण्यासाठी पोलिसांमध्ये फिर्याद दाखल करण्यात येईल. घरातील इनकमिंग मीटरच्या वायरला जॉईन देणे, मीटर बायपास करणे, मीटरचे सिल तोडणे, मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी करणे असे विविध वीज चोरीचे प्रकार यावेळेस उघडकीस आणले आहे. वीज चोरीच्या या धडक मोहिमेमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहेत.

कोणत्याही प्रकारचे विजेचा अनधिकृत वापर ग्राहकांनी कटाक्षाने टाळावा व सोप्या पद्धतीने उपलब्ध असलेली अधिकृत वीज जोडणी घेऊन वीज वापर करावा असे आवाहन महावितरणने केले आहे. यापुढे देखील वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई सुरू ठेवण्यात येणार आहे.

## दिपावली पहाट कार्यक्रमानी श्रोते मंत्रमुग्ध



**दै.रायगड नगरी । उरण**

शेतकरी कामगार पक्ष उरणच्या वतीने तालुका चिटणीस विकास नाईक यांनी दिपावली सणाचे औचित्य साधून उरणकरांसाठी जेएनपीटी एम.पी. हॉल येथे सोमवारी ( दि२४) सकाळी ठिक ६ वाजता दिपावली पहाट या कार्यक्रमा अंतर्गत स्वरांकुर पहाट संगीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी गायक गणेश घरत,लिना अभ्यंकर ( अलिबाग),चित्रा घरत व भंजन गायक डि.आर.पाटील यांनी सादर केलेल्या भक्ती गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.

दिपावली पहाट या भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन कामगार नेते भुषण पाटील, दिनेश पाटील व माजी उपसभापती महादेव बंडा यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी शेकाप तालूका चिटणीस विकास नाईक ,माजी सभापती नरेश घरत, महिला अध्यक्षा सौ सिमाताई अनंत घरत, निलेश म्हात्रे,युवा अध्यक्ष रमाकांत म्हात्रे,माजी उरण पंचायत समिती सदस्य दिपक ठाकूर, रमाकांत पाटील,माजी नगराध्यक्षा नाहीदा ठाकूर, गणेश भोईर,जन्नूशेठ भोईर,प्रकाश जोशी,माजी सभापती सागर कडू, दत्ता शा.घरत,माजी सरपंच भार्गव पाटील,सुधीर पाटील,रेखा पाटील, यशवंत ठाकूर,प्रकाश नाईक, नारायण घरत,मदन पाटील,रा.जि.प.मा.सदस्य जीवन गावंड,प्रा.एल.बी.पाटील,प्रकाश जोशी सह इतर मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमा प्रसंगी सादर करण्यात आलेल्या सुरेख भाव गीताना पखवाज वादक क्रिश ठाकूर,तबळा वादक जयदास ठाकूर, हार्मोनियम वादक मिलिंद म्हात्रे,प्रकाश जोशी यांनी सुरेख साथ दिली.तर सूत्रसंचालन रमाकांत मोकल यांनी केले.

# संक्षिप्त...

## खारघरमध्ये नि:शुल्क विपश्यना कार्यशाळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील पाली भाषा आणि बुद्धिझम विभाग, सत्याग्रह विपश्यना केंद्र आणि सत्याग्रह महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने २८ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत एकदिवसीय नि:शुल्क विपश्यना कार्यशाळा घेतली जाणार आहे. ही कार्यशाळा शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी आहे. कार्यशाळेत प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना सकाळ आणि सायंकाळचा नाष्टा व दुपारचे जेवण संस्थेतर्फे दिले जाणार आहे. प्रथम येणाऱ्यास आधी प्रवेश या तत्त्वानुसार संधी दिली जाईल. इच्छुकांनी प्रा. सुनीता वानखेडे, विभागप्रमुख पाली भाषा आणि बुद्धिझम विभाग, सत्याग्रह महाविद्यालय, सुप्पारक भवन, प्लॉट नं. ५२, सेक्टर १९, खारघर या ठिकाणी अथवा satyagrahacollegeyahoo.com वर संपर्क साधावा.

## पल्सर २२० मोटार सायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील टाटा मोटर्सचे वर्कशॉप शेडुंग टोलनाका येथे उभी करून ठेवलेली ५० हजार रुपये किमतीची एक मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

दिनेश वाघमारे (वय २८) याने त्यांची ५० हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची निळ्या रंगाची पल्सर २२० गाडी क्रं एम ४६ बीसी ४४४० हि टाटा मोटर्सचे वर्कशॉप शेडुंग टोलनाका येथे उभी करून ठेवलेली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली.

या चोरी बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# शिवसेना नांव अन् धनुष्यबाण गोठवले हे वेदनादायी : अमोल कारेकर

### आ.गोगावलेंच्या शिवसेना प्रवेशात महत्वाची भूमिका असल्याचा दावा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रभावित होऊन लोकसभा निवडणुकीवेळी खा.गीते यांच्या विजयासाठी पाच वेळा महाड विधानसभा मतदार संघात प्रयत्नशील राहिलो असून सध्याचे शिंदे गटाचे प्रतोद आ.भरत गोगावले यांना शिवसेनेमध्ये प्रवेश घेण्यासाठी महत्वपूर्ण भुमिका बजावली असल्याने ज्या शिवसेना पक्षाच्या माध्यमातून आम्ही आमच्या राजकीय कारकिर्दीचा उमेदीचा काळ उजळवला त्याच शिवसेनेचे नांव अन् धनुष्यबाण निवडणूक चिन्ह गोठवल्याने आम्ही पुर्वाश्रमीचे शिवसैनिकही व्यथित झालो असल्याचे मत महाड पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल कारेकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधीजवळ बोलता मांडले.

महाविद्यालयीन जीवनादरम्यान शिव-सेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रभावित होऊन शिवसेनेच्या माध्यमातून काम करताना संघर्षयोध्दा म्हणून आपली अनेक वर्षांची कारकिर्द ठरली असून बिरवाडी शाखा सेक्रेटरी पदाचे प्रभावी काम करताना तत्कालीन राज्यमंत्री प्रभाकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागप्रमुख, महाड पं.स.सदस्य, उपसभापती, शिवाई पतसंस्थेचा संचालक, शिक्षण प्रसारक मंडळ संचालक, कामगार संघटनांसह विविध संघटनांवर आक्रमक नेतृत्व केले.

राजकारणामध्ये सक्रीय होण्यासाठी तत्त्कालीन तालुकाप्रमुख सतीश देशमुख यांनी राजकीय गुरू म्हणून प्रेरित केले. याच काळात प्रताप शेडगे, नथूशेठ फळसकर, सुरेश गुडेकर, नारायण अहिरे, धोंडूमास्तर उतेकर, संभाजी साळुंखे आदींसोबत महाड पोलादपूर मतदार संघ ढवळून काढण्याचे काम आम्ही शिवसैनिकांनी केले. यामुळे आपणास माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचा स्वीय सचिव तसेच महाड पंचायत समितीचे उपसभापती पद शिवसेनेने दिले. माझ्या पत्नी सौ.अपेक्षा अमोल कारेकर यांना रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची संधी शिवसेनेच्या माध्यमातून मिळाली.

आमचे नेतृत्व प्रभाकर मोरे यांच्यासोबत आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर आजतागायत रायगड लोकसभेचे खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सन्मानाने कार्यरत आहोत. मात्र, १९९७ साली ज्या भरत गोगावले यांना काँग्रेसमधून शिवसेना पक्षप्रवेशासाठी बिरवाडी उपविभागप्रमुख पदाच्या माध्यमातून आपण तत्कालीन मंत्री प्रभाकर मोरे यांच्याकडे वाटाघाटी करून आग्रह धरला. त्यांचा २००४ मध्ये पराभव झाल्यानंतर भरत गोगावले यांनी २००९ मध्ये त्यांच्याऐवजी शिवसेनेची उमेदवारी मिळवून आजतागायत सलग तिसऱ्यांदा आमदारकी उपभोगली आहे. मात्र, आता त्यांनी थेट शिवसेना नांव आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण गोठविण्याकामी महत्वाची भूमिका घेतल्याने आपण पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असूनही व्यथित झालो असून आपण शिवसेनेत आणलेल्यांकडून हे वेदना देणारं महापाप घडलं असल्याची खंतही यावेळी अमोल कारेकर यांनी सांगितले.

महाड विधानसभा मतदार संघातील शिवसेना आणि सर्वपक्षिय कोणताही इतिहास विसरले नसल्याने आजही मनातील खंत उघडपणे व्यक्त करताना माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या आवाहनानुसार महाड व पोलादपूर तालुक्यातील जुन्या जाणत्या शिवसैनिकांचे पुन्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे ध्रुवीकरण होताना दिसून येत आहे, यामागे शिवसेना नांव गोठविण्याच्या प्रयत्नांनंतर पुन्हा वज्रमूठ वळून ताकदीने पुढे येण्याची इच्छा उघड झाली आहे, असे यावेळी अमोल कारेकर यांनी सांगितले.

## कोकण कट्टाची आदिवासी भगिनींना भाऊबीज भेट

**दै.रायगड नगरी । पेण**

समाज कार्यात अग्रेसर असणाऱ्या विलेपार्ले येथील कोकण कट्टा या सामाजिक संस्थेतर्फे दरवर्षी दिवाळीमध्ये पालघर येथील मोखाडा आदिवासी पाड्यातील आदिवासी महिलांसोबत भाऊबीज साजरी होत असते. मात्र यावर्षी कोकण कट्टाच्या सभासदांनी कोकणचे प्रवेषद्वार असणाऱ्या पेण तालुक्यातील आदिवासी पाड्यांची निवड केली. यामध्ये निगडावाडी, प्रधानवाडी, दर्गावाडी आणि भेंडीचीवाडी या वाड्यांचा समावेश आहे.



३४८ आदिवासी महिलांना भाऊबीज भेट म्हणून साडी - चोळी आणि फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच तेथील लहान मुलांना खाऊचे वाटपहि करण्यात आले. या समाज कार्यात पेण येथील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचाही समावेश होता. यावेळी आपल्या भाऊबीज कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांचे आदिवासी तरुणांनी आणि तरुणींनी स्वतः हून बनविलेले पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. भौतिक सोयी सुविधा पासून वंचित असलेल्या दुर्गम भागातील महिलांसोबत आपुलकीच्या भावनेने साजरी झालेली दिवाळी पाहुन येथील महिला भावुक झाल्या त्यांनी कार्यक्रम प्रसंगी कृतज्ञता व्यक्त केली.

कोकण कट्टा आणि ग्राम संवर्धन या संस्थेच्या संयुक्त विद्यमानाने केलेल्या या समाज कार्यात कट्टाचे संस्थापक अध्यक्ष अजित पितळे, ग्रामसंवर्धन संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, कोकण कट्टाचे ज्येष्ठ मार्गदर्शक दादा गावडे, खजिनदार सुजित कदम, दया मांडवकर, विवेक वैध्, सुनिल वनकुंद्रे, मनोज शेलार, बंडू डिके, देवदत्त साने, मनिष माईन, सुरेश लीमये, प्रथमेश पवार,आकांक्षा पितळे, नीता पैंगणकर, ग्राम संवर्धनच्या कार्यकर्ते उदय गावंड, राजू पाटील, मानसी पाटील, स्मिता रसाळ, पंकज म्हात्रे, शैलेश कोंडस्कर, जयेश म्हात्रे, सायली ठाकूर, सचिन पाटील, राजेश रसाळ आणि पत्रकार अरविंद गुरव आदी उपस्थित होते.

## स्वराज्य ग्रुप खोपटेच्या माध्यमातून स्मशान भूमी येथे बेंचेसचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटे गावातील स्मशान भूमी मध्ये अत्यंसंस्कार झाल्यानंतर ज्येष्ठांना,दिव्यांग बांधवांना बसण्यासाठी जागा नव्हती. त्यामूळे ज्येष्ठांना, दिव्यांगांना बसण्यासाठी स्वराज्य ग्रुप खोपटे उरणच्या माध्यमातून कै. कु. जितेश जगन्नाथ ठाकूर यांच्या स्मरणार्थ बेंचसचे लोकार्पण सरपंच विशाखा प्रशांत ठाकर यांच्या हस्ते करण्यात आले स्मशान भूमीत बेंचेसची व्यवस्था झाल्याने गावातील नागरिक, ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अत्यंसंस्कारासाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना आता स्मशान भूमी मध्ये बँचेस वर बसून आराम करता येणार असल्याने ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग बांधवानी स्वराज्य ग्रुप खोपटे उरणच्या कार्याचे कौतूक केले आहे. यावेळी बांधपाडाचे सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, खोपटा अध्यक्ष विश्वनाथ भास्कर पाटील, तंटा मुक्ती अध्यक्ष प्रमोद ठाकूर, सदस्य अच्युत ठाकूर, सदस्या जागृती घरत, सदस्य संदेश म्हात्रे, बांधपाडा अध्यक्ष प्रकाश ठाकूर, द.पी पाडा अध्यक्ष यशवंत ठाकूर, खोपटा सचिव कुमार ठाकूर, पाणी कमिटी सचिव विष्णू पाटील, भाजपा खोपटा अध्यक्ष नवनाथ ठाकूर, समीर पाटील, स्वराज्य ग्रूप चे अध्यक्ष प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, जितेशचे नातेवाईक तसेच स्वराज्य ग्रूप चे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परतीचा पाऊस झाला मुसळधार, खरीपाचे भातपिक चिखलात

### मोत्यासारखी पिकांची नासधूस, गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर शेकऱ्याच्या चिंतेत वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इतिहासात रायगड हे भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध समजले जात आहे परंतु मागील काही आठवड्यापासून धो धो कोसळणाऱ्या परतीच्या पावसाने अखेर रागडातील शेतकऱ्यांच्या पिकांचा घात केला तर मुसळधार पावसासारखे रुद्ररूप धारण केले काळ शुक्रवारी दुपारनंतर अचानक दणका दिला व भयानक झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे तर बाजारपेठेत दिवाळीसाठी खरेदीसाठी आलेल्या मंडळींची मोठी धावा धाव व पळापळ तर व्यवसायिकांची तर मोठी विक्रीसाठी मांडलेले समान गोळा करण्यासाठी मोठी धांदल उडाली परतीचा पाऊस हा अचानक मुसळधार झाल्याने बळीराजाची गेली वर्षभराची संपूर्ण मेहनत वाया जाण्याच्या मार्गावर तर शेतात आलेली मोत्यासारखी कणसे व खरीपाचे पीक पावसाच्या धुमाकुलमुळे चिखलात गरदले आहे तर बळीर-ाजाचे पीक तर गेलेच परंतु गुरांच्या वैरणीचा प्रश्न हा अनेक शेतकऱ्यांचा चिंतेचा विषय बनला आहे ऐन दिवाळीच्या तोंडावर धो धो कोसळणाऱ्या पावसाने रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.



ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासून पहाटे धुक्का,दुपारी मोठी उन्हाची झळाळी तर सायंकाळी अचानक होत असलेल्या पावसाने रोहा तालुक्यासह जिल्ह्यातील भात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. बळीराजाचे खरीपाचे पीक परतीच्या पावसाने अखेर शेवटच्याक्षणी मातीत लोदवले शेतात आलेले मोत्यासारखे पीक पाहून पडत असणाऱ्या पावसाच्या चिंतेने शेतकरी बळीराज्याचे डोळे अक्षरशः अश्रूमय होत आहेत तर दुपारनंतर विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाट करत दररोज पडत असलेला पाऊस आणि शेकडोंच्या हेक्टरीत येथील बळीराजाने केलेली खरिपाच्या हंगामात केलेली भात लागवड केलेल्या पिकांचे परतीच्या पावसात मोठे नुकसान झाले तर भातपिकांतून तयार होत असलेल्या गुरांच्या वैरणीचा पेंढा याची देखील आता संपूर्ण भात चिखलात गाडले गेल्याने धानसह याचा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बळीराजाची चिंता वाढली आहे.

शेतात जोरदारपणे आणि भरभराटीचे आलेले मोत्यासारखे भातपीकांची कणसे डोलाने डोलू लागली आठ ते दहा दिवसांवर बळीराजाआलेल्या भात कापणी याला सुरुवात करणार त्याआधीच पावसाने तडाखा देत पाऊस पडायला सुरुवात केल्यामुळे हातातोंडाशी आलेली मोत्यासारखी कणसे अक्षरशः जमीदस्त झाली असून पिकांचं शंभर टक्के नुकसान होत आहे. त्यातच दिवाळीचा सण सुरू झाला आहे शेतात पिकांचं नुकसान पाहून बळीराजाचे डोळे अश्रूमय होत आहेत. सोन्यासारखा पिंक वाया जात असल्याने त्यातच गुरांचा वैरण साठा याची मोठी चिंता बळीराजाला पडली आहे. त्यात यावर्षी काही शेतकऱ्यांनी भात पिकासह तीळ, नाचणी, वरीची व हळदीच्या पिकांची लागवड केली ते पीक देखील चांगल्या प्रकारे आली होती. काही विभागात ती देखील पिकं कापणीस योग्य झालेली आहेत मात्र गेली आठ दिवसांतून अधिक काळ परतीचा पाऊस कोसळत असल्याने त्या पिकांचे देखील मोट्या प्रमाणावर नुकसान होत आहेत.

## उरण नगरपरिषदेच्या वाचनालयात पुस्तकांचे पूजनाने धनत्रयोदशी साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील विमला तलाव शेजारी असलेल्या उरण नगर परिषदेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयामध्ये दिप पुजन करीत असतांना स्पर्धा परीक्षेकरिता अत्यावश्यक असलेल्या पुस्तकांचे पुजन करण्यात आले. मानवी जी-वनात, मनुष्याच्या आयुष्यात असलेले पुस्तकांचे महत्वाचे स्थान ओळखून धनत्रयोदशी निमित्त पुस्तकांचे पुजन करुन धनत्रयोदशी साजरी करण्यात आली.



यावेळी एन आय हायस्कूलचे निवृत्त मुख्याध्यापक टि डब्ल्यू पाटील , प्र. ग्रंथपाल संतोष पवार, नियमित वाचक विद्यार्थी शुभम गौडदाब, महेंद्र मेश्राम व वाचक वर्ग उपस्थित होते.

उरण नगरपरिषदेच्या लायब्ररी मध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असणारी यूपीएससी, एमपीएससीची बहूतांश पुस्तके विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध आहेत. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या गरुडझेप संकल्पनेची माहिती सर्व विद्यार्थ्यांना येथे दिली जाते. आणि एक विशेष म्हणजे १० वी, १२ वी सायन्स, कॉमर्स चे बोर्ड परिक्षेला सोडविलेल्या पेपर्सचा संच देखिल येथे उपलब्ध आहे.

ज्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक अभ्यास करावयाचा आहे त्यांनी उरण नगरपरिषदेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयामध्ये नक्की अभ्यास करण्यासाठी यावे. हि आपल्या साठी मोफत सुवर्ण संधी आहे.असे मत ग्रंथपाल तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

## रांगोळीतून साकारली एकविरेची प्रतिकृती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर कातलपाडा येथील कस्तुरी म्हात्रे हिने दीपावलीच्या सणानिमित्त रांगोळीतून आदिमाया आदिशक्ती एकविरा आईची सुंदर अशी प्रतिकृती साकारली असून, कस्तुरी म्हात्रे हिच्या कलेचा आविष्कार येथे प्रत्यक्ष पाहायला मिळत आहे.



रंगांची जादू आणि जीव ओतून रांगोळीत आणलेला जिवंतपणा एकूणच रांगोळीची भव्यता पाहताना प्रत्यक्ष अनुभव येतो. कस्तुरी म्हात्रे आणि तिच्या बहिणी स्वरा म्हात्रे व पूर्वा म्हात्रे यांनी या रांगोळीसाठी चार तास वेळ देत ही रांगोळी साकारली आहे. यासाठी त्यांनी एक किलो रांगोळीच्या रंगांचा वापर केला आहे. वास्तवाला भिडणारी ही आदिमाया आदिशक्ती एकविरा देवीची रांगोळी, रांगोळीच्या देखाव्यात एखाद्या शिल्पा प्रमाणेच भर घालत आहे.

रांगोळीतून, अगदी हुबेहूब साकारलेली ही एकविरा देवीची रांगोळी कातलपाडा आळीतील नागरिकांचे आकर्षण ठरली असून, रस्त्यातून ये-जा करणारे नागरिकही पाच मिनिटे थांबून, रांगोळी पाहून थक्क होत आहेत. सोशल मीडियाचा आधार घेत, या रांगोळीचे फोटो सध्या इंटरनेटवर व्हायरल झाले असून कस्तुरी म्हात्रे हिला याबद्दल अभिनंदनाच्या कमेन्ट्स येत आहेत. तर श्रद्धाळू भाविकांना देवीच्या मूळ स्थानावर येऊन दर्शन घेतल्याचा भास होत आहे. दरम्यान कस्तुरी, स्वरा व पूर्वा यांचे चिरनेर परीसरातून कौतुक होत आहे.

## जीर्णावस्थेतील भूमीअभिलेख कार्यालय पर्यायी जागेत हलविण्यात यावे : मंगेश दांडेकर

### खासदार सुनील तटकरे यांना दिले निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड मधील भूमी अभिलेख कार्यालय जीर्णावस्थेत असून त्याची पार दुरावस्था झाली असल्याने सदर कार्यालय तातडीने पर्यायी जागेत हलविण्यात यावे. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख मुरुड याचे कार्यालय हे आज रोजी ज्या इमारतीमध्ये आहे ती इमारती ही अतिशय जुनी असून सदर इमारतीमध्ये ठेवण्यात आलेल्या मुरुड तालुक्याचे सर्व दफ्तर (रेकॉर्ड) हे पावसाचे पाण्याचे अतिशय खराब झाले आहेत त्यामुळे सदर कार्यालयातील रेकॉर्ड उपलब्ध होण्याकरीता मुरुड तालुक्यातील सर्व जनतेला त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.



सदर इमारत ही वापरणे योग्य नसल्यामुळे मा. तहसिलदार मुरुड पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेबाबत पत्र व्यवहार करणेत आला आहे. मात्र आज पर्यंत त्यावर कोणत्याही प्रकारचा विचार विनिमय झालेला नाही. मुरुड तालुक्यातील सर्व जमिनीचे रेकॉर्ड हे उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयांत जतन करुन ठेवले गेले आहेत, परंतु सदर इमारतीची दुर्दशा झाली असल्यामुळे सर्व रेकॉर्ड जतन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. सद्याचे युग जरी संगणकीकृत असले तरी मुरुड मध्ये नेट कनेक्टीव्हीटीचा त्रास होत आहे

तरी मुरुड तालुक्यातील उपअधिक्षक भूमि अभिलेख मुरुड यांचे कार्यालयाकरीता पर्यायी जागा म्हणून तहसिलदार मुरुड यांचकडील प्रस्तावा मध्ये नमूद केलेली गटविकास अधिकारी मुरुड यांचे निवासस्थानचे जागेमध्ये हलविणेबाबत व सदर निवासस्थानाचे ठिकाणी उपअधिक्षक भूमिअभिलेख यांचे कार्यालयाचे नविन बांधकाम करणेंस परवानगी देणेबाबत आपल्या कडून शिफारस करणेत यावी.असे मंगेश दांडेकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.